# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 15.04.2025** **वार - मंगळवार**

---

**डॉक्टर संरक्षण कायदा**

देश पातळीवर डॉक्टरांच्या संरक्षणासाठी केंद्र सरकारनं कायदा करावा अशी मागणी इंडियन मेडिकल असोसिएशनचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. दिलीप भानुशाली यांनी केली. एका कार्यक्रमासाठी पुण्यात आले असताना ते बोलत होते. या कायद्यात डॉक्टरांवरील हल्ल्यासाठी किमान सात वर्षांच्या शिक्षेची तरतूद असावी आणि हा गुन्हा अजामीनपात्र करावा असं भानुशली यांनी म्हटलं आहे.,केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**ऊस गाळप समाप्त**

राज्यातील ऊस गाळप हंगाम अंतिम टप्प्यात असून, बहुतांश कारखान्यांनी ऊस गाळप बंद केलं आहे. यंदाच्या गाळप हंगामासाठी 31 मार्चअखेर साखरेचं उत्पादन  80 लाख 26 हजार टनपर्यंत पोहोचलं आहे, मागील हंगामाच्या तुलनेत या वर्षी साखरेचं उत्पादन सुमारे 30 लाख मेट्रिक टन कमी आहे. साखर आयुक्तालयाच्या अहवालानुसार  महाराष्ट्रातील एकूण 192 साखर कारखान्यांनी ऊस गाळप समाप्त केलं असून, यामध्ये पुण्यातील 28 कारखान्यांचा समावेश आहे.

**अर्बन डिझाईन सेल**

शहरांचं सौंदर्य अबाधित राहावं तसंच ,व्यवसाय आणि पर्यटन या दोन्हींना चालना देण्यासाठी महापालिकांमध्ये अर्बन डिझाइन सेलची स्थापना करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. यासाठी पुणे शहरात महापालिका आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली जाणार आहे. या सेलच्या माध्यमातून शहर सौंदर्यीकरणाचा आराखडा करण्यात येणार असून , वारसा स्थळे, नदी सुधार प्रकल्प, आणि मंदिर परिसरांच्या सौंदर्यीकरणासाठी ही समिती उपाययोजना सुचविणार आहे.

**छत्रपती संभाजी महाराज पुतळा**

जंगली महाराज रस्त्यावरील छत्रपती संभाजी महाराज उद्यनात छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा बसविण्यासाठी पुणे महापालिकेच्या शहर सुधारणा समितीनं मंजुरी दिली आहे. छत्रपती संभाजी महाराज यांनी वयाच्या 18 व्या वर्षी संस्कृत भाषेत  बुधभूषण हा ग्रंथ रचला होता. त्यांच्या या ग्रंथाची माहिती जगभर पोहोचवण्यासाठी बुधभूषण ग्रंथ रचतानाचे छत्रपती संभाजी महाराज यांचा अंदाजे 8 ते 10 फुटांचा पुतळा बसविण्यात येणार आहे.

**पुरस्कार**

बंधुत्वाची भावना समाजात चांगुलपणा वृद्धिंगत करते. माणूस जोडण्याचं काम बंधुता चळवळीतून होत आहे असं प्रतिपादन ज्येष्ठ उद्योजक कृष्णकुमार गोयल यांनी केलं. पुण्यात 27 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या समारोपात ते आज बोलत होते. ज्येष्ठ विचारवंत प्रा. सुभाष वारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रा. डॉ. शिवलिंग मेनकुदळे, आणि विश्वबंधुता मूल्यसंवर्धन समितीच्या सदस्या डॉ. तेजश्री पारंगे यांना 'विश्वबंधुता दर्पण पुरस्कार' प्रदान करण्यात आला.

**समारोप**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीनं सुरू असलेल्या, महात्मा जोतीराव फुले आणि राज्य भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार प्रबोधन पर्वाचा समारोप उद्या ‘संविधान शिल्पकार’ या महानाट्याच्या सादरीकरणानं होणार आहे. नागपूरच्या ‘द बोधिसत्व फाऊंडेशन’ संस्था प्रस्तुत हे महानाटक पिंपरीमधल्या एच.ए.मैदानावर  संध्याकाळी पाच वाजता सुरू होईल.

**महोत्सव**

ब्रह्मनाद कला मंडळाच्या वतीनं येत्या 19 आणि 20 एप्रिलला 24 व्या  ब्रह्मनाद महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात प्रसिद्ध सनई वादक पंडित प्रमोद गायकवाड यांना यंदाचा ब्रह्मनाद पुरस्कार प्रदान करण्यात येईल. ज्येष्ठ कलाकारांसह युवा कलाकारांचा सहभाग हे यंदाच्या महोत्सवाचं वैशिष्ट्य आहे, अशी माहिती संस्थेचे संस्थापक पंडित संजय गरुड यांनी पत्रकार परिषदेत दिली.

**दरोडा**

पुण्यातील धायरी भागातील श्री ज्वेलर्स या दुकानावर पिस्तुलाचा धाक दाखवून दरोडा टाकण्यात आला. आज दुपारी घडलेल्या या घटनेत तीन दरोडेखोरांनी दुकानातील 20 ते 25 तोळे

सोने लुटुन नेलं. मात्र त्यासाठी वापरलेलं पिस्तुल खेळण्यातील असल्याचं पोलीस तपासात स्पष्ट झालं आहे.

**फुटबॉल**

वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशनच्या वतीनं महाराष्ट्र राज्य आंतर-जिल्हा अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धा पुण्यात सुरू आहेत.20 वर्षाखालील मुलांच्या या स्पर्धेत यजमान पुणे संघाचं आव्हान संपुष्टात आलं आहे. उपांत्यपूर्व फेरीत रायगड संघाने पुणे संघाचा 1-0 असा पराभव केला.

**स्पर्धा**

पुणे जिल्हा बिलीयडर्स आणि स्नुकर संघटना  यांच्या मान्यतेनं पुण्यात ‘द क्यु कल्चर करंडक’ अजिंक्यपद स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत रोहीत रावत, अभिजीत रानडे, धवल गढवी आणि तन्मय जातकर यांनी आपापल्या प्रतिस्पर्धी खेळाडूंचा पराभव करून उपांत्यपुर्व फेरीत प्रवेश केला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 40 अंश तर किमान तापमान 19 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**